www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १३४ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.१२ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

# उठसूठ आरोप करणाऱ्यांनो माझ्या नादाला लागू नका

## आडवा आला तर ही दाढी सोडत नाही–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**नागपूर**–मी आरोपाला आरोपांनी उत्तर देणार नाही तर तर कामाने उत्तर देईल. माझ्यावर उठसूठ आरोप करत आहेत. ही दाढी हलकी समजू नका. दाढीची काही काडी फिरवली की तुमची लंका जाळून टाकेल. माझ्या नादाला लागू नका. मला आडवा आला की मी त्याला सोडत नाही, असा घणाघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर केला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज नागपूरच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. काही लोक आज रामाच्या अस्तित्वाबद्दल प्रश्न निर्माण करतात. पण मी एवढंच सांगतो की, जो राम का नहीं वो किसी काम का नहीं, असा टोला त्यांनी विरोधकांना लगावला.असंगाशी तुम्ही संग केलेला होता, तेव्हाच तुम्ही बाळासाहेब ठाकरे यांचा विचार सोडला. माझा पक्ष चोरला, माझा बाप चोरला, असं दररोज सुरू आहे. एखाद लहान मुलगा असतो तशी कृती सध्या सुरू आहे. बाळासाहेब चोरायला काय एखादी वस्तू आहेत का?, असा सवाल एकनाथ शिंदेंनी केला.बऱ्याचं दिवसांपासून रामटेकला येणार, आपलं दर्शन घेणार हे चाललं होतं. अखेर आज रामाचं दर्शन घेण्याचा योग आला. रामटेक ही एक ऐतहासिक भूमी आहे. अनेक शतकांच्या वनवास पार करून राम विराजमान झाले. लाखो करोडो राम भक्ताचं स्वप्न पूर्ण झालं. अयोध्येत राम मंदीर व्हावं असं स्वप्न होतं. संपूर्ण जल्लोषाचं वातावरण तयार झालं. दररोज लाखो लोक त्यांचं दर्शन घेतात.अयोध्येचं दर्शन करण्यापूर्वी रामटेकला हिंदुत्वाचा भगवा झेंडा खांद्यावर घेवून आलेलो आहे. सहाशे वर्षापासून रामाचं मंदीर येथे असल्याचं पाहिला मिळतं. शिवसंकल्प अभियान आपण घेवून पुढे जातोय. शिवछत्रपती शिवरायांच्या भूमीत शिवसंकल्प अभियान सुरू झालंय, असं एकनाथ शिंदे म्हणाले.राष्ट्रपती राजवट अशीचं लागते का? कधी निवडणुका घ्या, कधी हे करा, असा थयथयाट सुरू आहे. कुठल्याही गुन्हेगाराला पाठीशी घालणारं हे सरकार नाही. हनुमान चालीसा म्हणणाऱ्यांवर तुम्ही देशद्रोह्याचा गुन्हा दाखल केला. अशा किती घटना झाल्याचं पाहिला मिळालं. आपल्या मित्रपक्षांशी बेईमानी केली होती. खरी बेईमानी आपण २०१९ ला केली. धनुष्यबाण आपण वाचवण्याचं काम केलं. जिकडे आपण जातोय तिकडे जनता साथ देतेय, असा दावा एकनाथ शिंदेंनी केला.महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांनी आपल्याला साथ दिली असती का? एक शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री झाला हे बघवलं नाही. ही इंडीया आघाडी बिघाडी झालेली आहे. या देशाला आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदींशिवाय पर्याय नाही. महाराष्ट्रामध्ये अब की बार ४५ पार अशी भूमिका घ्यायची आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.



## आज पासून प्रियदर्शनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत क्रीडा स्पर्धाच्या आयोजन

**भद्रावती | प्रतिनिधी**

येथील ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळाद्वारे संचालित प्रियदर्शनी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था बंगाली कॅम्प येथे दिनांक १२ ते १४ फेब्रुवारी पर्यंत जिल्हास्तरीय शासकीय व अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे क्रिकेट, हॉलीबॉल व कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन १२ फेब्रुवारी ला सकाळी दहा वाजता चंद्रपूर जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी मा. वैभव बोनगीरवार यांचे शुभहस्ते होणार आहे यावेळी प्रमुख अतिथी म्हणून चंद्रपूरचे क्रीडा अधिकारी मा. अविनाश पुंड, सहाय्यक आयुक्त भैयाजी येरमे, ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष धनंजय गुंडावर आदींची उपस्थिती राहणार आहे. दिनांक १४ ला सायंकाळी सात वाजता श्री साईबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठापना निमित्त वर्धापन दिन सोहळा व विविध क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण तथा सांस्कृतिक कार्यक्रम भद्रावती वरोरा विधानसभा क्षेत्राच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत तर धनंजय गुंडावार यांच्या अध्यक्षतेत होणार आहे यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक आयुक्त भैयाजी येरमे, माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर आदींची उपस्थिती राहणार आहे उपरोक्त कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन प्राचार्य प्रवीण बालसराफ यांनी केले आहे.

## आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते कोसारा येथील गुरु तेग बहादूर नगर मधील ४५ लक्ष रुपयांच्या विकासकामाचे लोकार्पण

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

मौजा कोसारा गावातील गुरु तेग बहादूर नगर येथील ४५ लक्ष रुपयातून करण्यात आलेल्या विकासकामांचे आज रविवारी आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले आहे. यात सभामंडप आणि संरक्षण भिंतीच्या कामासह इतर अनुषंगिक कामांचा समावेश आहे. यावेळी श्री गुरुद्वारा गुरु तेग बहादुर नगर चे अध्यक्ष सरदार बलदेव सिंग डल्लेके, चेअरमन सरदार जगतारसिंग गिल, कार्याध्यक्ष सरदार राणापालसिंग डल्लेके आदींची प्रमूख अतिथी म्हणून तर ऑल इंडिया सिख सोशल वेलफेअर फेडरेशनचे अध्यक्ष सरदार हरविंदरसिंह धुन्नाजी यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती.



आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने मतदार संघात विविध विकासकामे केल्या जात आहे. त्यामुळे मतदार संघातील विकासकामांना गती आली आहे. ग्रामीण भागातही आमदार किशोर जोरगेवार यांनी मोठा निधी उपलब्ध करुन दिला असून सदर निधीतून विकासकामे केल्या जात आहे. सोबतच आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने सामाजिक, धार्मिक आणि क्रिडा क्षेत्रातही मोठे काम केल्या जात आहे. दरम्यान मौजा कोसारा येथील श्री गुरु तेग बहादुर नगर येथे सभामंडप आणि संरक्षण भिंत बांधण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती. सदर मागणीसाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी स्थानिक आमदार निधीतून ४५ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला होता. यातील २५ लक्ष रुपये खर्च करुन सभामंडपचे बांधकाम करण्यात आले तर २० लक्ष रुपये खर्च करुन येथील संरक्षण भिंत व अनुषंगिक कामे पुर्ण करण्यात आली आहे. सदर सर्व कामाचे आज आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. आपण केलेली मागणी पुर्ण करता आल्याचे समाधान आहे. या भागात आणखी विकासकामे करायची आहे. मतदार संघातील नागरिकांनी सुचविलेली कामे करण्यावर आमचा भर राहिला आहे. शहरी भागासह ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी मोठा निधी आपण खेचून आणला आहे. शिंदे – फडणविस सरकारही चंद्रपूर मतदार संघाच्या विकासासाठी सकारात्मक असून त्यांच्या सहकार्याने मोठा निधी या भागात उपलब्ध होत असल्याचे ते यावेळी म्हणाले या कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रेरणेतून युवा क्रांती संघटने मार्फत घेण्यात आले भव्य रक्तदान शिबिर

**मूल | प्रतिनिधी**

ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या संयुक्त विद्यमानाने निशुल्क रोग निदान व उपचार शिबिर कर्मवीर महाविद्यालयामध्ये घेण्यात आले. त्या शिबिर मध्य अनेक मोठ्या गंभीर आजार व त्या गंभीर आजारावर सर्जरीसाठी रक्ताची गरज असते त्याच्यासाठी रक्तदानामुळे पेशंटची प्राण वाचण्यास मदत होईल.

ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रेरणेतून समाजासाठी उपयुक्त असलेले भव्य रक्तदान शिबिर युवाक्रांती संघटना मुल तर्फे कर्मवीर महाविद्यालय मुल येथे आयोजित करण्यात आले रक्तदान हेच श्रेष्ठदान या संकल्पनेच्या विचारधारणेने एकूण ६५ रक्तदात्यांनी वेळेत वेळ काढून रक्त देण्याकरिता उपस्थित झाले व रक्तदान केले. या संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी युवा क्रांति संघटनेचे अध्यक्ष प्रणित पाल,निखिल वाढई,निहाल गेडाम, सूरज गेडाम ,सौरभ वायडे,सुधीर वाढगुरे,राज चिमूलवार,जितू टिंगूसले,अक्षय



दुमेवार,कृष्णा बोरेवार,अंकित कटकेलवार,हेमंत सोनालकर, सोनल आगबत्तनवार यांनी महारक्तदान शिबिराचे आयोजन करून उपस्थित होते.भव्य रक्तदान शिबिराला प्रमुख मार्गदर्शक म्हणून चंदू आष्टनकर व प्रशांत बोबाटे उपस्थित होते.या कार्यक्रमाला भाजपा जिल्हा अध्यक्ष हरीश शर्मा सुद्धा उपस्थित होते.



महिलांच्या अफाट गर्दीतून सुरक्षित जात असताना प्रसिद्ध मराठी अभिनेत्री आर्ची(छाया : प्रणय बांगरे.)



आमदार बंटी भांगडिया यांनी आयोजित केलेल्या नागभीड येथील हळदी कुंकू च्या कार्यक्रमात मराठी चित्रपट सैराट मधील प्रसिद्ध अभिनेत्री रिंकू राजगुरू (अर्ची )ची मनमोहक अदा. छाया :प्रणय बांगरे.

## बोरचांदली प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेला लागले ग्रहण

### पाच दिवसांपासून दहा गावांचा पाणीपुरवठा ठप्प;विद्युत पुरवठा खंडित

**मुल | रोहित कामडे**

मुल तालुक्यातील नागरिकांचे आरोग्य निरोगी रहावे व गावांकरिता स्वच्छ पाणी मिळावे म्हणून जिल्हा परिषदेने बोरचांदली व १९ गावांकरिता जीवन प्राधिकरणाची प्रादेशिक पाणीपुरवठा योजना जवळपास पंधरा वर्षांपूर्वी कार्यान्वित केली. मात्र बोरचांदली प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेला ग्रहण लागल्याने पाच दिवसांपासून या योजनेचा पाणीपुरवठा बंद आहे. त्यामुळे महिलांची पाण्यासाठी भटकंती सुरू आहे.

बोरचांदली प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे बिल थकल्याने महावितरणाने विद्युत पुरवठा खंडित केला. त्यामुळे पाच दिवसांपासून १० गावांचा पाणीपुरवठा ठप्प झाला आहे. परिणामतः दहा गावांत पाणी टंचाई निर्माण झाली असून प्रशासनांविरुद्ध रोष व्यक्त केल्या जात आहे.या योजनेची देखभाल व दुरुस्तीचे काम चंद्रपूर येथील कंत्राटदाराकडे आहे.



जिल्हा परिषद प्रशासनाने या योजनेच्या देखभाल दुरुस्ती करिता लाखो रुपयांचा निधी देतो. मात्र कंत्राटदार या योजनेच्या देखभाल दुरुस्ती कडे पूर्णतः दुर्लक्ष करीत आहे.

**बोरचांदलीत पाईपलाईन लिकेज् असल्याने दहा दिवस तर आता पुन्हा पाच दिवस पाणीपुरवठा ठप्प आहे. विरईतही हिच परिस्थिती असल्याने पाणी समस्या गंभीर झाली आहे. त्यामुळे पाण्यासाठी महिलांना भटकंती करावी लागत आहे.**

परिणामतः योग्य नियोजना अभावी या योजनेचा पाणीपुरवठा अनेकदा प्रभावित होतो. त्यामुळे महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. योजने अंतर्गत बोरचांदली,फिस्कुटी, विरई, येरगाव,पिपरी दीक्षित, चकबेंबाळ, सितंळा,भेजगाव, येसगाव, कवडपेठ,आदी गावांचा समावेश आहे. या दहाही गावात सध्या स्थितीत थेंबभरही पाणी मिळत नसल्याने महिलांमध्ये संताप व्यक्त केल्या जात आहे.

## अवकाळी पाऊस व गारपीटमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या

### ना.सुधीर मुनगंटीवार यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

### त्वरीत पंचनामे करून अहवाल सादर करण्याच्या सुचना

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्हयातील काही तालुक्यात शनिवारी (१० फेब्रु) झालेला अवकाळी पाऊस व गारपीटमुळे शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तत्काळ मदत उपलब्ध करून देण्याचे निर्देश राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

१० फेब्रवारी रोजी जिल्ह्यातील वरोरा, भद्रावती, चंद्रपूर, पोंभूर्णा या तालुक्यात अवकाळी पावसासह गारपीट तर ब्रम्हपुरी, नागभीड, राजूरा, कोरपना, मूल व इतर तालुक्यात अवकाळी पाऊस झाला. त्यामुळे हरभरा, गहु, तूर, ज्वारी, जवस व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानीचे त्वरीत पंचनामे करून नुकसानग्रस्तांना तातडीने मदत देण्यात यावी, असे निर्देश ना. सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे. तसेच जिल्हा प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पालकमंत्री कार्यालयालासुध्दा सादर करावा, अशाही सूचना त्यांनी दिल्या.आपदग्रस्तांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे असून कोणीही मदतीपासून वंचित राहू नये, अशा पद्धतीने कार्यवाही करण्याचे निर्देशही ना.मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.




# मराठी व हिंदी भाषेचे कविवर्य!

**महादजी शिंदे यांचा मूळ पिंड लढवय्या वीराचा असला, तरी ते राजकारणातही वाकबगार होते. युद्धप्रसंगी केव्हा लढावे? केव्हा माघार घ्यावी? याचे उत्तम ज्ञान त्यास होते. आपले लष्कर त्यांनी फ्रेंच अधिकाऱ्यांच्या मदतीने सुसज्ज केले आणि शस्त्रास्त्रे तयार करून घेतली. दिल्लीवर कब्जा, राजस्थानात वर्चस्व व उत्तर हिदुस्थानात दरारा ही त्याची कामगिरी ऐतिहासिक महत्त्वाची आहे. त्यांच्या पावन स्मृती जागविण्यास श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा लेख अवश्य वाचा... संपादक.**

महादजींना अपत्य नव्हते. अखेर त्यांनी आपल्या जहागिरीच्या व्यवस्थेसाठी आपल्या भावाचा नातू दौलतराव याची निवड केली होती. त्यांचा मूळ पिंड लढवय्या वीराचा असला, तरी ते राजकारणातही वाकबगार होते. युद्धप्रसंगी केव्हा लढावे? केव्हा माघार घ्यावी? याचे उत्तम ज्ञान त्यास होते. आपले लष्कर त्यांनी फ्रेंच अधिकाऱ्यांच्या मदतीने सुसज्ज केले आणि शस्त्रास्त्रे तयार करून घेतली. दिल्लीवर कब्जा, राजस्थानात वर्चस्व व उत्तर हिदुस्थानात दरारा ही त्याची कामगिरी ऐतिहासिक महत्त्वाची आहे. महादजींना हिंदू तथा मुस्लीम साधुसंतांविषयी आदर होता. बीडच्या मन्सूरशाह वली या मुस्लीम साधूवर त्यांची विशेष भक्ती होती. याशिवाय सोहिरोबानाथ आंबिये, लक्ष्मण महाराज रामदासी, शिरगावकर, मल्लप्पा, रासकर, दत्तनाथ राक्षसभुवनकर आदी साधुसंतांवर त्यांची श्रद्धा होती. त्यांना हिंदी, उर्दू, संस्कृत, फारसी या भाषा अवगत होत्या. महादजी मराठी व हिंदी भाषांत कविता करीत असत. त्यांची कृष्णभक्तीवरील कवने उपलब्ध आहेत. ते कीर्तन करताना ती म्हणत असत. त्यांनी गीतेवर टीका लिहिली होती. परंतु ती उपलब्ध नाही. त्यांच्या आश्रयास सुखदेव वैद्य, बालमुकुंद मिश्र, सविता, सुरती मिश्र यांसारखे वैद्य, कवी तसेच गवई, तमासगीर, चित्रकार व पखवाजी होते. महादजींनी उज्जैन, गोकुळ, वृंदावन, पुष्कर आदी ठिकाणी बांधकामे केली. राहत्या जांबगावास माधवनगर हे नाव देऊन तेथे महाल बांधला. महादजी कडक शिस्तीचे आणि अत्यंत स्वाभिमानी होते. गुलाम कादर, कारस्थानी इस्माईल बेग यांस त्यांनी फाशीची शिक्षा दिली, तर ज्याने होळकरांविरुद्ध कारस्थान केले तो गोपाळराव व आनंदराव नरसिंग यांना त्यांच्या अपराधाबद्दल शिक्षा ठोठावल्या.

महादजी शिंदे म्हणजे उत्तर पेशवाईतील एक पराक्रमी सेनानी आणि मराठा साम्राज्याचे मुत्सद्दी होते. पहिल्या बाजीराव पेशव्याचा विश्वासू सरदार राणोजी यास चिमाबाई या राजपूत स्त्रीपासून झालेला हा मुलगा होय. महादजींचा जन्म दि.३ डिसेंबर १७३० रोजी पुणे येथे झाला. शिंद्यांचे मूळ घराणे सातारा जिल्ह्यातील कण्हेरखेड ता. कोरेगाव या गावचे होते. राणोजी व जयाप्पा यांच्या माळव्यातील व उत्तरेकडील इतर मोहिमांतून महादजींना शिपाईगिरीचे शिक्षण मिळाले. त्यांनी प्रथम तळेगाव-उंबरीच्या निजामावरील लढाईत पराक्रम करून नाव मिळविले. त्यांनी औरंगाबाद येथे सन १७५१, साखरखेडले येथे सन १७५६, पंजाब येथे सन १७५९ इत्यादी सालच्या मोहिमांतही त्यांनी भाग घेतला. पानिपतच्या तिसऱ्या लढाईत एका पठाणाने केलेल्या आघातामुळे ते लंगडे झाले. तेव्हा राणेखान नावाच्या एका मुसलमान भिस्त्याने त्यांना मदत केली. महादजींनी त्यास भाऊ मानून पुढे सरदार केले. थोरल्या माधवरावांच्या कारकिर्दीत राघोबाच्या नादी लागून पटवर्धन प्रतिनिधी यांच्याप्रमाणेच निजामाला जाऊन मिळण्याच्या बेतात ते होते. गोहदच्या जाटांविरुद्ध राघोबाच्या नेतृत्वाखाली ते लढले. थोरल्या माधवरावांनी त्यांना सन १७६८मध्ये सरदारकी दिली. मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर त्यांची दौलत खालसा करावी, म्हणून राघोबा प्रयत्नशील होता. तेव्हा महादजींनी अहिल्याबाईस मातोश्री मानून सर्वतोपरी सहकार्य देण्याचे ठरविले. पेशव्यांनी त्यांना पानिपतचे अपयश धुऊन काढण्यासाठी बिनीवाले व कानडे यांबरोबर दिल्लीकडे रवाना केले. तेथे महादजींनी नजीबखानाचा रोहिलखंड प्रांत लुटून ताब्यात घेतला आणि शाह आलम बादशहास इंग्रजांच्या तावडीतून



सोडवून दिल्लीच्या तख्तावर बसविले. त्यामुळे पेशव्यांस उत्तरेत मराठ्यांचा जम बसविण्यास महादजींचे मोठे साहाय्य झाले. राजस्थानात उदयपूरच्या तंट्यात त्यांनी साठ लाख खंडणीसह प्रांत मिळविला आणि आपला सुभेदार तेथे नेमला.

नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर बाराभाईचे कारस्थान उद्भवले. कोणत्या पक्षास मिळावे? याविषयी महादजींचा निश्चय प्रथम झाला नाही, परंतु नाना फडणीस व सखारामबापू यांनी त्यास मुलूख वगैरे देऊन आपल्या पक्षाकडे घेतले आणि राघोबाचा बंदोबस्त केला. तोतयाचे बंड महादजींनी मोडले. कोल्हापूरच्या छत्रपतींनी पेशव्यांचा मुलूख घेऊन कारस्थाने आरंभिली, तेव्हा महादजींनी त्यांना धडा शिकविला आणि यापुढे राघोबा व हैदर यांच्याशी संबंध ठेवणार नाही, असा करार करून घेतला. नाना फडणीसांचा चुलत भाऊ मोरोबा फडणीस याने राघोबा, इंग्रज व तुकोजी होळकर यांच्या मदतीने बंड केले आणि तीन महिने पुण्याचा कारभार हाती घेतला. तेव्हा महादजींनी मुत्सद्दीगिरीने होळकर व सखारामबापू यांना त्यातून फोडले. त्यांनी इंग्रजांना चुचकारून बंड मोडून काढले. इंग्रजांच्या कवायती सेनेची शिस्त पाहून त्याने डि.बॉइन या फ्रेंच सेनाधिकाऱ्यास आपल्या पदरी ठेवले व शिस्तबद्ध फौज तयार केली. त्यांच्या पदरी तीस हजार कवायती पायदळ, पाचशे तोफा व तीस हजार घोडदळ एवढे सुसज्ज सैन्य होते. ते मुख्यत्वे ग्वाल्हेर आणि राजधानी उज्जैन येथे होती. त्यात मराठ्यांपेक्षा मुसलमान, राजपूत व युरोपीय यांचा भरणा जास्त होता. त्याने तोफा ओतण्याचा कारखाना आग्र्यात काढून हत्यारे तयार करण्यास उत्तेजन दिले. दिल्लीच्या बादशाहीवरील मराठ्यांचे वर्चस्व कमी झाले असताना या कवायती फौजेच्या जोरावर ते पुन्हा प्रस्थापित केले. त्यासाठी दिल्लीतील मुसलमान सरदारांच्या सन १७८४मधील भांडणाचा फायदा घेऊन बादशहास ताब्यात घेतले. बादशहाकडून वकील-इ-मुतालिक- मुख्य कारभारी ही पदवी मिळविली. स्वतःस नायबगिरी मिळवून बादशहास ६५ हजारी नेमणुका करून सर्व अधिकार आपल्या हाती घेतले. शिवाय बादशहाकडून गोवध बंदीचे फर्मान काढविले. महादजी मथुरेस राहू लागले. त्यांच्या वाढत्या सत्तेस शह देण्यासाठी मुसलमान सरदार व काही राजपूत राजे यांनी त्याविरुद्ध बंडाळी माजविली. लालसोटच्या लढाईत बादशहाची सर्व फौज राजपुतांना मिळाली. त्यावेळी महादजींना माघार घ्यावी लागली. इस्माईल बेग, गुलाम कादर वगैरेंनी दिल्ली, अलीगढ वगैरे ठाणी काबीज करून महादजींना चंबळ नदीच्या पलीकडे रेटले. या सुमारास गुलाम कादरने शाह आलमचे डोळे काढून त्याच्या जनानखान्याची बेअब्रू केली. त्यावेळी महादजींनी ताठर भूमिका सोडून पुणे दरबारची म्हणजे नाना फडणीसांची मदत मागितली. सन १७८८साली नानांनी अली बहादरास त्यांच्या मदतीला पाठविले. त्यांनी शीख-जाट यांना मदतीस घेऊन गुलाम कादर व त्याचे सहकारी मुस्लीम सरदार आणि उदेपूर, जोधपूर, जयपूर आदी राजपूत राजे यांचा पराभव केला दिल्ली पुन्हा हस्तगत केली. राजस्थानवर आपले वर्चस्व स्थापित केले. हतबल शाह आलम यास पुन्हा दिल्लीच्या तख्तावर बसविले आणि गुलाम कादरखान व बेग यांस देहान्त शासन केले. त्यानंतर पातशाही कारभार महादजींनी आपल्या हाती घेतला. अशाप्रकारे त्यांनी आपल्या पराक्रमाने व कर्तृत्वाने सतलजपासून तुंगभद्रापर्यंत मराठी साम्राज्याच्या सीमा भिडविल्या. असा उत्तर हिंदुस्थानात मराठी सत्तेचा दरारा निर्माण केला.

उत्तर हिदुस्थानात सुमारे बारा वर्षे राहून तेथे सर्व स्थिरस्थावर झाल्यावर महादजी जून १७९२ मध्ये पुण्यास आले. सवाई माधवरावांनी त्यांचा यथोचित मानसन्मान केला. सुमारे पावणेदोन वर्षे ते पुण्यात स्वस्थच होते. अखेर एकाएकी नवज्वर होऊन पुण्याजवळील वानवडी येथे दि.१२ फेब्रुवारी १७९४ रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांची स्मृतिछत्री वानवडीस उभारली आहे.

!! त्यांच्या अचाट कार्यकर्तृत्वाला स्मृतिदिनी मानाचा मुजरा !!

**संकलन व शब्दांकन -**
**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या शाखा स्थापन करून विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवावेत : प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक महाविद्यालयात राष्ट्रवादी काँग्रेसच्या शाखेची स्थापना करून विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवावेत असे आवाहन राष्ट्रवादी
विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत दादा कदम यांनी केले आहे.

परभणी शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयात येथे बुधवारी दि.७ रोजी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचा जिल्हास्तरीय मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्यासपीठावर शहर जिल्हाध्यक्ष प्रताप भैय्या देशमुख ,भावनताई नखाते, प्रा.रामेश्वर आवरगंड, नाशेर शेख, शंकरराव भागवत, राजू शिंदे, सचिन पाचपुंजे, महेबूब पिंजारी, पंजाब पतंगे, बाळासाहेब बुलबुले, विजय धरणे, नंदाताई राठोड, विश्वजित वाघमारे, किरण तळेकर उपस्थित होते. प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांच्या



अध्यक्षतेखाली घेण्यात आला.
यावेळी परभणी मनपाचे माजी महापौर प्रताप भैय्या देशमुख यांनी गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणात आर्थिक मदत करण्याचे आश्वासन दिले.या मेळाव्यात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत दादा कदम यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले यात त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक जीवनात येणाऱ्या अडचणी संघटनेच्या माध्यमातून सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातील असे सांगून विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून पक्ष बळकट करण्याचे काम मराठवाडा दौऱ्याद्वारे करीत असल्याचे सांगितले.

तसेच नवनियुक्त पदाधिकारी यांच्या नियुक्त्या प्रदेशाध्यक्ष कदम यांच्या हस्ते करण्यात आल्या. विद्यार्थी मेळाव्यात गुणवंत विद्यार्थी, खेळाडू, एमपीएससी, युपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन विविध पदावर नियुक्त उमेदवारांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी किरण तळेकर, रोहन समाले, नागेश खंदारे, सुरेंद्र रोडगे, अनिल गोरे, सुरेश काळे, बंडू म्हेत्रे, एकीन भाई, शेख अस्लम, माही दांडगे, रामभाऊ भवर, सचिन सोनटक्के, संकेत वाकले, सुदाम तुपसुंदरे, कबीर खान, इकबाल सय्यद, निहाल कोसडीकर, अशोक उबाळे, अशोक सामाले आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाध्यक्ष दिपक वारकरी, वैभव शिंदे यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन रामेश्वर आवरगंड यांनी केले.

## सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी घडविले कलागुणांचे दर्शन

### विवेकानंद विद्यालयात रंगले स्नेहसंमेलन



**अंबाजोगाई । सतिश आकात**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद प्राथमिक विद्यालयात दि.०६ व ०७ फेब्रुवारी दोन दिवस स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर केले.
दिनांक ०६ फेब्रुवारी मंगळवार रोजी बालवाडी ,१ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांनी क्रीडास्पर्धेत मिळवलेल्या यशाबद्दल सकाळच्या सत्रात बक्षीस वितरण कार्यक्रम घेण्यात आला.सर्वेश काबरा (सी.ए.)यांची प्रमुख उपस्थिती होती.व्यासपीठावर उपेंद्र बेलूरकर ,हरिभाऊ चौधरी ,करुणा कुलकर्णी ,मुख्याध्यापक शंकर शितोळे यांची उपस्थिती होती.सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणुन डॉ.सौ.अनुपमा जवळेकर व डॉ.सौ.अंजली भाबट ( जाधव ) यांची उपस्थिती होती. देवा श्रीगणेशा ,आमच्या पप्पांनी गणपती आणला ,मैं निकला गड्डी ले के ,खंडेरायाच्या लग्नाला ,घुमर गीत ,भगवा रंग, जय जवान जय किसान आदी गीतांवर नृत्य सादर करण्यात आले.रामलीला नाटिकेने प्रेक्षकांचे लक्ष वेधले. सूत्रसंचालन स्वप्नाली देवडे व विनोद मंडलिक यांनी केले.दिनांक ०७ फेब्रुवारी बुधवार रोजी इयत्ता ५ ते ९ च्या विद्यार्थ्यांचे सकाळी बक्षीस वितरण पार पडले.उद्योजक राम नाना खराबे व विमा प्रतिनिधी भारत डख यांची विशेष उपस्थिती होती.सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी डॉ.सुबोध माकोडे व डॉ.सौ.हर्षा माकोडे यांची उपस्थिती होती. पहिलं नमन करुनी वंदन ,तू जोगवा वाढ माई ,मराठवाडा गीत ,दिंडी गजर माऊलीचा आम्ही, धनगर,सवारी भवानी चौकामध्ये ,अंबाबाई गोंधळा ये ,मर्द मावळा आदी गीतांवर बहारदार नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले.शिवराज्याभिषेक सोहळ्याने उपस्थितांच्या मनात नवचैतन्य निर्माण केले. सूत्रसंचालन विजय चौधरी यांनी केले.स्नेहसंमेलन प्रमुख शंकर राऊत व सहप्रमुख दीपाली पवार तसेच सर्व शिक्षक ,कर्मचारी यांनी यशस्वीते साठी प्रयत्न केले.दोन्ही सांस्कृतिक कार्यक्रमाची सांगता भारतमातेच्या आरतीने झाली.

## दीनदयाल विद्यालय,कनिष्ठ महा तथा ज्ञानपीठाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची सांगता

**देऊळगाव राजा । प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालय तथा (कॅन्व्हेंट) ज्ञानपीठाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची शुक्रवार दि.०९ फेब्रु.२०२४ रोजी ०६ फेब्रुवारी पासून सुरू असलेल्या विविध क्रीडा,कला आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे आणि प्रमाणपत्र वितरीत करून सांगता करण्यात आली.
या प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.रामकृष्णदादा शेटे प्रमुख पाहुणे म्हणून,संचालक श्री.राजाभाऊ खरात,श्री.अशोकभाऊ कोटेचा,सहदेवरव सुरडकर, बाबासाहेब मिनासे,अरविंदराव शिंगणे, स्थानिक सल्लागार श्री.धर्मराज हनुमंते,श्री.छबुराव भावसार,नगर संघचालक श्री.पुरुषोत्तम भाऊ धन्नावत,श्री.देवीदासजी बोबडे,श्री. त्र्यंबकराव जायभाये काका,माजी पर्यवेक्षक श्री.आर.के.डोईफोडे भाजपचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष श्री.गणेशदादा मान्टे,श्री. विनायकराव कुलकर्णी आदी उपस्थित होते. अध्यक्षांच्या वतीने बोलत असतांना श्री.अशोकभाऊ कोटेचा यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवण्यातच शिक्षकांची कसोटी असते असे प्रतिपादन केले तसेच दे.राजा पोलीस ठाण्याचे ठाणेदार श्री. संतोषजी महल्ले यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या आभासी जगातून बाहेर पडून वास्तविक जीवन जगले पाहिजे असे सांगितले. या संपुर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा श्री.एस.डब्ल्यू सस्ते सर यांनी केले तर प्रास्ताविक पर्यवेक्षक श्री.एस.एन.व्यास सर यांनी केले आणि प्राचार्य श्री.एस.बी.गारडे सर यांनी उपस्थितांचे आभार मानले.



## मराठा आरक्षणासाठी जरांगेंचे आंतरवालीत तिसरे उपोषण सुरु ;आताचे आंदोलन या सरकारला झेपणार नाही

**वडीगोद्री-**मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगेंनी आंतरवालीत शनिवारी (१० फेब्रुवारी) तिसरे उपोषण सुरू केले. आता सरकारला अंमलबजावणीचा निर्णय घेऊनच यावे लागेल. नाहीतर महाराष्ट्र पुन्हा विरोधासाठी उभा राहणार आहे. ते सरकारला परवडणार नाही, असे जरांगे यांनी सांगितले.
यापूर्वी जरांगेंनी २९ ऑगस्ट २०२३ रोजी पहिले उपोषण केले होते. ते १७ दिवस चालले होते. मग २४ ऑक्टोबर रोजी दुसरे उपोषण केले. ते ९ दिवस चालले होते. शनिवारी उपोषणास सुरुवात करताना त्यांनी फडणवीसांवर टीका केली. ते म्हणाले की, चांगल्या लोकांवर गुन्हे दाखल करायचे, बाबा-महाराजांना गुन्ह्यात अडकवायचे असे सुरू आहे. राज्यात सर्व उलटसुलट होत आहे. त्याचे फडणवीस साहेबांना आता हसू येत असेल. मात्र, हा समाज खूप मोठा आहे हे विसरू नका. विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवारांनी ओबीसींची वाट लावून नवा अध्यादेश काढू देणार नाही, असा इशारा दिल्याचे निदर्शनास आणून दिल्यावर जरांगे म्हणाले की, राहून राहून कुत्रा चावल्यासारखे वडेट्टीवार बोलतो. त्याला राहुल गांधी सांगेल त्या त्या वेळेस बोलतो. भुजबळ आणि वडेट्टीवार एकसारखेच. पण वडेट्टीवारांनी त्या भंगाराचे ऐकून बोलणे योग्य नाही.जरांगे पाटील यांच्या उपोषणात १२३ गावांतील मराठा बांधवांनीही सहभाग घेतला आहे. त्यात महिलांची संख्या लक्षणीय आहे. मराठा समाजाचा अंत पाहू नका. तातडीने पावले उचलून आरक्षणाचे आश्वासन पूर्ण करावे, अशी मागणी त्यांनी केली.आश्वासनाची अंमलबजावणी करण्याची वेळ आली असताना दुर्लक्ष होत आहे. मराठा समाजाचा अंत सरकारने पाहू नये. मनोज जरांगे पाटलांच्या तब्येतीचे भान ठेवत आश्वासन पाळावे. सुवर्णा तुपे, छत्रपती संभाजीनगर जरांगेंनी आरक्षणासाठी अनेक वेळा उपोषण केले आहे. त्यांचे शरीर पण त्यांना साथ देत नाही. त्यांना काही झालं तर त्याला सरकार जबाबदार राहील. ही बाब लक्षात घेऊन महायुती सरकारने विशेषत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वेगाने हालचाली कराव्यात. राहुल बापूराव मोरे, चाकरवाडी, बीडमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी मराठा समाजाला आश्वासन दिले आहे. छत्रपती शिवाजी महारांची शपथ घेतली आहे. त्यांनी त्या शपथेला पाळावे. मराठा समाजाच्या गोरगरीब लेकरांसाठी योग्य निर्णय घ्यावा. दगाबाजी करू नये. सीमा शिंदे, छत्रपती संभाजीनगर



# कोविड काळात भ्रष्टाचार करणाऱ्या उद्धव ठाकरेंना इतरांवर टीका करण्याचा अधिकार नाही-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**पालघर**–काँग्रेसच्या भ्रष्टाचाराच्या कोचिंग क्लासमध्ये प्रशिक्षण घेऊन कोविडच्या काळात लाखो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या उद्धव ठाकरे यांना इतरांवर टीका करण्याचा अधिकार नैतिक अधिकार नाही. त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराचे आणि शिवसेनेच्या नेत्यांच्या केलेल्या पानउताऱ्याचे पाप उद्धव ठाकरे कुठे फेडणार, असा संतापजनक सवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.

दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, वाघाचे कातडे पांघरलेला लांडगा अशा शेलक्या विशेषणांनी त्यांनी उद्धव ठाकरे यांचा उद्धार केला आहे. तर पालघर-विरार सागरी महामार्गाची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी या वेळी केली आहे.लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यातील मनोर येथे आयोजित कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांचा खरपूस समाचार घेताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वारंवार कौतुक केले. महाराष्ट्रात लोकसभेच्या ४५ जागा जिंकण्याचा निर्धार त्यांनी केला. या वेळी खासदार राजेंद्र गावित, आमदार शांताराम मोरे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कुंदन संखे, जिल्हा प्रमुख वसंत चव्हाण, पालघर लोकसभा संपर्कप्रमुख रवींद्र फाटक आदी उपस्थित होते.शिंदे म्हणाले, की उद्धव ठाकरे आमच्यावर गद्दार, खोके घेतल्याचे आरोप करतात; परंतु त्यांच्या टीकेला काहीही अर्थ नाही. उलट एक बोट दुसऱ्याकडे करताना चार बोट आपल्याकडे असतात, याचे भान उद्धव यांना नाही. त्यांनी गहाण टाकलेला धनुष्यबाण आम्ही सोडवला. शिवसैनिकांचा पंचप्राण असलेला शिवसेना पक्ष व धनुष्यबाण आपल्याकडे आल्यामुळे त्यांना पोटशूळ उठला आहे. आमच्यावर खोक्याचे आरोप करणारे कंटेनरने स्वतः मात्र पैसे घेतात याचा मी साक्षीदार आहे.उद्धव यांच्या काळात त्यांच्या अहंकारी वृत्तीने मागे गेले. काँग्रेसच्या कट, करप्शन आणि कमिशनचा अजेंडा उद्धव ठाकरे यांनी राज्यात राबवला. उलट शिवसेनेतील फुटीनंतर आमच्याकडे शिवसैनिकातल्या शिवसैनिकांच्या घामाचे पन्नास कोटी रुपये त्यांनी मागितले. आम्हाला संपत्ती नको. पैसे नको, बाळासाहेबांचे विचार हीच आमची संपत्ती आहे असे समजून आम्ही त्यांना पन्नास कोटी रुपये देऊन टाकले. आमची प्रवृत्ती देण्याची आहे.





घेण्याची नाही अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीकेचे आसूड ओढले आहे.एकीकडे कोरोनाने माणसे मरत असताना हे मात्र मृतदेहा ठेवण्यासाठीच्या पिशव्यात पैसे खात होते. खिचडी घोटाळा केला. माणसे मरताना पैसे खाण्याचे हे पाप उद्धव ठाकरे कोठे फेडणार आहेत, असा सवाल त्यांनी केला काँग्रेसच्या भ्रष्टाचाराच्या कोचिंग क्लासमध्ये उद्धव हे नवे विद्यार्थी शिकून चांगलेच पारंगत झाले. त्यांना सत्ता आणि पैशाची भूक आहे, असे आरोप त्यांनी केले.काँग्रेसच्या मदतीने पंतप्रधान होण्याचे स्वप्न पाहणारे हे 'फेसबुक लाईव्ह पंतप्रधान असतील का अशी बोचरी टीका करून ते म्हणाले, की आम्ही जी विकासकामे करतो आणि आमच्याकडे शिवसैनिकांचा तसेच आमदार, खासदार, जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांचीरांग लागली आहे, ते पाहून यांच्या पोटात पोटशूळ उठला आहे. यांच्या पोटावर उपचार करण्यासाठीच आपण बाळासाहेब ठाकरे दवाखान्याची योजना राबवली आहे. त्यात मी त्यांच्यावर उपचार करावे लागतील.मुंबई आणि कल्याण येथील घटनांचा संदर्भ देऊन त्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. ठाकरे आणि कंपूच्या गुन्हेगारीच्या आणि गैरव्यवहाराच्या प्रकरणाचा तपास करायचा झाला तर त्यांना तिहारही पुरणार नाही, असे सांगून सुशांतसिंह राजपूत, दिशा सालियन यांच्या प्रकरणातील पुरावे कोणी मिटवले, असा सवाल शिंदे यांनी केला.मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची व्याप्ती आपण आता वाढवत आहोत. मुंबईपासून पालघर पर्यंत हे प्राधिकरण काम करणार आहे. वसई-विरार सागरी महामार्गाचे काम सुरू झाले आहे. आता विरार-पालघर सागरी पूल बांधून मुंबई पालघरला आणखी जवळ करू. त्याचबरोबर पालघर परिसरातील वनजमीन भूमी हक्क व अन्य प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन त्यांनी दिले. कन्या योजनेच्या अनुदानात वाढ करून ते पंचवीस हजार रुपये करण्यात आले असल्याची घोषणा त्यांनी केली याबाबतचा अध्यादेशही लवकरच काढणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# मोदी नैतिकतेच्या गप्पा मारतात:महाराष्ट्रातील गुंडाराज गंभीर वाटत नाही का?-संजय राऊत

**मुंबई**–पंतप्रधान मोदी नैतिकतेच्या गप्पा मारतात, पण महाराष्ट्रासारख्या राज्यात सुरू असलेले गुंडा राज गंभीर वाटत नाही का? असा खडा सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उपस्थित केला आहे. तसेच मोदींनी आता केदारनाथच्या गुहेत जाऊन तपश्चर्या व आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

मागच्या काही दिवसांपासून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत शिंदे सरकारवर गंभीर आरोप करत आहेत. गुंडांसोबतचे फोटो शेअर करत संजय राऊत शिंदे पिता-पुत्रावर गंभीर आरोप करत आहेत. महाराष्ट्रात गुंडांचे राज्य! कोण चालवीत आहे? या शीर्षकाखाली त्यांनी मुखपत्रातून थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सवाल केला आहे.''पंतप्रधान मोदी नैतिकतेच्या गप्पा मारतात, पण महाराष्ट्रासारख्या राज्यात त्यांच्या आशीर्वादाने गुंडांचे राज्य सुरू आहे. त्यावर भाजपवाले गप्प आहेत. महाराष्ट्रातील कंत्राटदार, व्यापारी, दुकानदार सरकारी गुंडांना खंडणी देऊन थकले आहेत. मंत्रालयात व मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी गुंड टोळ्यांबरोबर बैठका होतात. हे गंभीर वाटत नाही काय?'' असे संजय राऊतांनी म्हंटले आहे.''पंतप्रधान मोदी यांनी केदारनाथच्या गुहेत जाऊन तपश्चर्या व आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. मोदी खोटे बोलतात व त्या खोटेपणाची 'री' त्यांचे लोक ओढतात. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना मोदी साधारण तासभर बोलले. ते विषय सोडून बोलले. त्यातील ८० मिनिटे ते काँग्रेसवरच बोलत राहिले. पंडित नेहरूंनी देशाला आळशी बनवले, असे एक विधान त्यांनी भाषणात केले. इंदिरा गांधींवरही ते बोलले. ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झालेला आपला देश मेहनतीने उभा करायचा हा संदेश नेहरूंचाच होता. मोदी यांच्या मते, नेहरूंनी देशवासीयांना आळशी बनवले. नेहरूंना असे बोलणे हा समस्त कष्टकरी देशवासीयांचा अपमान आहे'', अशी टीकाही संजय राऊतांनी केली आहे.''महाराष्ट्रात सरळ सरळ गुंडांचेच राज्य सुरू आहे व त्यास पंतप्रधान मोदी व शहा जबाबदार आहेत. गुंड खुलेपणाने राज्यकर्त्यांना भेटू शकतात



तेव्हा त्यांचा आत्मविश्वास वाढतो. शिवसेनेचे युवा नेते अभिषेक घोसाळकर यांच्यावर गुरुवारी मारिस या गुंडाने गोळ्या झाडल्या व हत्या केली. बंदूक चालवण्याचा हा आत्मविश्वास आला हेच गुंडाराज. हा आत्मविश्वास गुंडांना मोदी-शहा, शिंदे-फडणवीसांमुळे मिळत आहे'', असा हल्लाबोल राऊतांनी केला आहे.पंतप्रधान मोदी व अमित शहांनी एकनाथ शिंदे, अजित पवार यांना महाराष्ट्रावर लादले. या दोघांच्या छत्रछायेखाली गुन्हेगारी-गुंडगिरी जोरात फोफावली. भ्रष्टाचार, अपहरण, खंडणी, हत्या हा व्यापार भरभराटीस आला व इतर सर्व उद्योग महाराष्ट्रातून गुजरातला गेले तरी शिंदे-पवार काळात गुन्हेगारीचा व्यापार वाढला. महाराष्ट्रातील ठेकेदार आणि इंजिनीअर संघटनांनी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना संयुक्त पत्र लिहून गुंडगिरीपासून संरक्षणाची मागणी केली. 'सरकारात सहभागी असलेल्या पक्षांचे कार्यकर्ते धमक्या देऊन वसुली करतात, खंडणी मागतात. नाहीतर ठेकेदारांची अधिकृत सरकारी कामे अडवून ठेकेदार व त्यांच्या कर्मचाऱ्यांवर हल्ले केले जात आहेत. आधी संबंधित ठेकेदारांची खोटी पार करायची व नंतर पैशांची मागणी करायची. यामुळे अनेक विकासकामे खोळंबून पडली. ठेकेदारांच्या मूळ रकमांपेक्षा खंडणी वसुलीचा आकडा जास्तच आहे व एकाच वेळी सत्तेतील तीन तीन पक्षांच्या पदाधिकाऱ्यांना ही खंडणी देऊन आम्ही सगळे मेटाकुटीस आलो आहोत' असे या पारीत सांगितले आहे व ते गंभीर आहे. महाराष्ट्र राज्याच्या या दुरवस्थेला जबाबदार कोण?'',असे संजय राऊतांनी म्हंटले आहे.

# उद्धव ठाकरेंच्या डोक्यावर परिणाम झाला : मी गेट वेल सून एवढेच म्हणेन-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई**–राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केलेली टीका जोरकसपणे फेटाळून लावली आहे. उद्धव ठाकरे यांची भाषा व शब्द पाहिले असता त्यांच्या डोक्यावर परिणाम झाल्याचे माझे ठाम मत बनले आहे. त्यामुळे केवळ मी गेट वेल सून असे म्हणेन, असे ते म्हणालेत.

उद्धव ठाकरे यांनी शनिवारी राज्यात गत काही दिवसांपासून सुरू असलेल्या गुन्हेगारीच्या घटनांवरून राज्य सरकारवर तिखट हल्ला चढवला. महाराष्ट्रात गत काही दिवसांपासून गुन्हेगारीच्या अनेक घटना घडल्या. पण काल गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या वक्तव्यानंतर त्यांच्यासाठी माझ्याकडे शब्दच उरले नाहीत. मी त्यांच्यासाठी वापरलेले फडतूस - कलंक आदी शब्द फारच सौम्य आहेत. आता महाराष्ट्राला मनोरुग्ण गृहमंत्री लाभाला आहे का? असा प्रश्न पडत आहे, असे ते शनिवारी येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले होते.उद्धव ठाकरे यांच्या या टीकेला देवेंद्र फडणवीस यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, राज्यात घडलेल्या घटना निश्चितच गंभीर आहेत. पण त्या वैयक्तिक वैमनस्यातून घडल्या आहेत. त्यामुळे त्यांचा कायदा - सुव्यवस्था व राज्याच्या परिस्थितीशी संबंध जोडणे चुकीचे आहे. सरकार याविषयी कठोर कारवाई करत आहे.उद्धव ठाकरे यांची भाषा व त्यांचे शब्द पाहिले असता त्यांच्या डोक्यावर परिणाम झाल्याचे माझे ठाम मत झाले आहे. त्यामुळे मी त्यांना केवळ गेट वेल सून असे म्हणेन, असेही देवेंद्र फडणवीस यावेळी ठाकरे यांच्यावर निशाणा साधताना म्हणाले.तत्पूर्वी, उद्धव ठाकरे यांनी अभिषेक घोसाळकर यांच्यावर मॉरिसने गोळीबार केला की अन्य कुणी? असा सवालही उपस्थित केला होता. अभिषेक घोसाळकरवर गोळ्या मॉरिसने चालवल्या की अन्य कुणी? अभिषेक व मॉरिस या दोघांनाही मारण्याची सुपारी आणखी कुणी दिली होती का? अभिषेक घोसाळकर आणि मॉरिसचा फेसबुक लाइव्हचा व्हिडिओ समोर आला. यात गोळ्या झाडल्याचे दिसते. पण त्या कोण झाडते हे दिसत नाही. मॉरिसने बॉडीगार्डच्या पिस्तुलातून गोळ्या चालवल्याचे सांगितले जाते. पण त्या गोळ्या खरेच त्याने चालवल्या की, आणखी कुणी चालवल्या? त्या दोघांना मारण्याची सुपारी आणखी कोणी दिली होती का? हा एक मोठा प्रश्न मनात आहे, असे उद्धव ठाकरे या प्रकरणी म्हणाले होते.

# इंद्रायणी नदीतील प्रदूषणावर तात्काळ कारवाई करणार:उपमुख्यमंत्र्यांचे आश्वासन

**पुणे**–इंद्रायणी नदीच्या प्रदुषणासंदर्भात कारवाई करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यामुळे आता आळंदीकरांची या इंद्रायणी नदीच्या प्रदुषणापासून मुक्तता होण्याची शक्यता आहे. देवेंद्र फडणवीस आज आज आळंदी दौऱ्यावर आहेत. यावेळी ते बोलत होते.वारकरी संप्रदायाचं श्रद्धास्थान असणारी इंद्रायणी नदीवरील प्रदुषणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे अनेक नागरिकांचं आरोग्य धोक्यात आहे.मागील काही महिन्यांत इंद्रायणी नदीच्या प्रदुषणाचा प्रश्न नागरिकांनी सरकार दरबारी अनेकदा मांडला होता. मात्र यावर कोणतीही करवाई होताना दिसली नाही. अनेक राजकीय नेत्यांनी यासंदर्भात कारवाईचे आदेश दिले मात्र प्रदुषणाचे प्रमाण वाढतानाच दिसत आहे. संपूर्ण नदी फेसाळलेली दिसते. या नदीच्या प्रदुषणामुळे आळंदीतील हजारो नागरिकांचा जीव धोक्यात असल्याचे अनेकदा नागरिकांनी बोलून दाखवलं आहे.आळंदीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वारकरी शिक्षण संस्थेच्या 'बंकटस्वामी सदन'



या विद्यार्थी वसतीगृहाचे लोकार्पण करण्यात आले. वारकरी शिक्षण संस्थेतील सुमारे ५०० विद्यार्थ्यांच्या निवास व्यवस्थेकरीता ५ कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केली.तसेच ''वारकरी शिक्षण संस्थेचे कार्य बघून मनाला समाधान होते. मानव समाजाला प्रेरणा देणाऱ्या भागवत धर्माची पताका फडकत ठेवण्याचे काम वारकरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून होत आहे. संस्थेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून भारतीय सांस्कृतिक विचार लाखो लोकांपर्यंत पोहोचवण्यात येतो. संस्थेच्या माध्यमातून भारतीय संस्कृती आणि आपला विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले जाते'', असे फडणवीस यावेळी म्हणाले.दरम्यान, इंद्रायणी नदीत विषारी फेसाचा थर तरंगत आहे. यामुळे नदीतील प्रदूषणाची भीषणता लक्षात येते. आषाढी वारी, कार्तिकी एकादशी अशा प्रसंगी लाखो वारकरी आळंदीनगरीत दाखल होतो. तेव्हा याच इंद्रायणी नदीत ते पवित्र स्नान करतात अन् तीर्थ म्हणून हेच रसायनयुक्त पाणी पितात. पण आता वारकरी अन स्थानिकांना या पाण्यामुळं आजार जडत आहेत. गेल्या सात वर्षांपासून अनेकदा अशी परिस्थिती उद्भवलेली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तशा तक्रारी ही करण्यात आल्या आहेत. त्यांनी काही कंपन्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. मात्र प्रदुषण कमी होताना दिसत नाही आहे. त्यामुळे आता थेट देवेंद्र फडणवीसांनी कारवाई करण्याचे आदेश दिले आहे. त्यामुळे प्रदुषण दूर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मुख्यमंत्री फेकूचंद, चोरमंडळाचे सरदार गृहमंत्र्यांना राज्य सांभाळणे कठीण

## राऊतांकडून मुख्यमंत्र्यांचा आणखी एक फोटो ट्विट

**मुंबई**–मुख्यमंत्री फेकूचंद असून चोरमंडळाचे ते सरदार आहेत अशी घणाघाती टीका ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर केली आहे. संजय राऊत यांनी मुख्यमंत्री शिंदे यांचा आणखी एक फोटो ट्विट केला आहे. खंडणी, अपहरणसारख्या गुन्ह्यांत आरोपी असलेले लाल सिंग यांचा मुख्यमंत्र्यांसोबतचा हा फोटो शेअर करत संजय राऊत यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डिवचण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांना हे राज्य सांभाळणे कठीण झाले आहे असा हल्लाबोल देखील त्यांनी केला.

यावर बोलतांना आज प्रसार माध्यमांशी संवाद साधताना संजय राऊत यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर जहरी टीका केली आहे. ''तो गुंडा नाही महागुंडा आहे. असे छोटे मोठे गुंडे त्यांच्या पक्षात बसलेले आहेत. गेल्या १० दिवसात त्यांच्यात पक्षात महाराष्ट्रातून सामील झालेल्या गुंडांचे फोटो समोर आणले. विशेषतः मुख्यमंत्री आणि त्यांचे चिरंजीव यांच्यासोबतच ते फोटो होते. हे सरकार आणि या राज्यातील मुख्यमंत्री काय करत आहेत?'', अशी टीका राऊतांनी केली आहे. राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करा आणि निवडणूक घ्या असेही राऊत म्हणाले.पुढे, राज्यात सुरू असलेल्या या गुंडाराजच्या विरुद्ध काय पावले उचलावीत यासाठी महाविकास आघडीमध्ये चर्चा सुरू असल्याचे संजय राऊतांनी सांगितले. महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड तसेच राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या नेत्यांसोबत चर्चा सुरू असून लवकर याबाबत आम्ही भूमिका जाहीर करू, अशी माहिती संजय राऊतांनी दिली.यावेळी संजय राऊत यांनी मुंबई पोलिसांना देखील खडेबोल सुनावले आहेत. ''मुख्यमंत्री, गृहमंत्री गुंडांचे समर्थन करतात. गुंडांची परेड काढणे हा केवळ दिखावा आहे. हल्ला करणाऱ्यांची परेड का काढली नाही? तसेच मुंबई पोलिसांनी ही नौटंकी बंद करावी. हल्ला करणाऱ्या गुंडांची परेड काढा तरच तुम्ही पोलिस आयुक्त नाही तर भाजपचे कार्यकर्ते'', असे म्हणत राऊतांनी मुंबई पोलिसांवर निशाणा साधला.संजय राऊत यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला आहे. ''मुख्यमंत्र्यांवर कोण विश्वास ठेवणार ते फेकूचंद आहेत. चोरमंडळाचे ते सरदार आहेत. मुख्यमंत्र्यांच्या आसपास गुंड नव्हे विचारवंत असावे लागतात. अभ्यास असावा लागतो. गुंडांसोबत बैठकघेऊन बुद्धीचे दार उघडत नाहीत. आजच्या मुख्यमंत्र्यांबरोबर आरोपींची बैठक होत असते'', असे राऊत म्हणाले.पैचान कौन? मा. गृहमंत्री महोदय, हे लाल सिंग महोदय आहेत. खंडणी.. अपहरण..अशा सध्या किरकोळ ठरवल्या गेलेल्या गुन्हातील आरोपी. टीम मिंधे चे खास मेंबर..काय करणार तुम्ही? गुंडांनी गुंडासाठी चालवलेले राज्य! अशा आशयाचे ट्विट करत संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला आहे.दरम्यान, संजय राऊत हे सध्या सातत्याने मुख्यमंत्री शिंदे यांचे काही आरोपींसोबत फोटो शेअर करत असल्याचे पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांनी आरोपी, गुंडांसोबतचे फोटो शेअर करण्याचा सपाटाच लावला आहे. गुंडांनी गुंडांसाठी चालवलेले राज्य असे म्हणत ते राज्य सरकारवर टीका करत आहेत.

# स्पंदन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व वाकी (घे.) ग्रामपंचायतीच्या वतीने सर्वरोग निदान शिबिर संपन्न

**सांगोला । प्रतिनिधी**

स्पंदन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व वाकी घे. ग्रामपंचायतींच्या वतीने शनिवारी दिनांक १० फेब्रुवारी रोजी सर्वरोग निदान शिबिर संपन्न झाले. यावेळी स्पंदन चे अध्यक्ष डॉ पियुष साळुंखे पाटील हे बोलताना म्हणाले पूर्वी सांगली, पंढरपूर ,सोलापूर येथे रुग्ण जाण्याचे प्रमाण जास्त होते ,इमर्जन्सी मध्ये तिथे पर्यंत पोहचणे अतिशय जिकिरीचे होवून जायचे यामध्ये रुग्ण जगण्याचे प्रमाण फक्त दहा टक्के होते.परंतु स्पंदन हॉस्पिटल आणि येथे काम कारणारे आमचे सहकारी व मी २४ तास आपल्यासाठी सज्ज आहोत. कोणतेही पेशंट असू द्या आमच्या हॉस्पिटल मध्ये त्यावरील तज्ञ डॉक्टर उपचार करतात. या वेळी प्रमुख पाहुणे प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ व स्पंदन हॉस्पिटल चे अध्यक्ष डॉ पियुष साळुंखे पाटील,डॉ सचिन गवळी, फिजिशियन डॉ.अतुल बोराडे,डॉ. शैलेश डोंबे,डॉ.अजिंक्य नष्टे,बालरोग तज्ञ डॉ संदिप देवकते,स्त्री रोग तज्ञ डॉ नेहा साळुंखे पाटील डॉ मेघना देवकते,



सर्जन डॉ.सौरभ अजळकर, स्पंदन चे संचालक डॉ.निलेश इंगवले,डॉ महेश लिगाडे ,डॉ वैभव जांगळे ,डॉ योगेश बाबर, घेरडी प्राथमिक आरोग्य केंद्र डॉ खांदापुरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात धन्वंतरी पूजन व दीप प्रज्वलन सरपंच अर्चना शिंदे,उपसरपंच रमेश कांबळे,जेष्ठ नेते दादासाहेब देवकते, प्राचार्य बाळासाहेब शिंदे ग्रामपंचायत सदस्य यांच्या उपस्थिती मध्ये पार पडला.या वेळी डॉ योगेश बाबर यांनी स्पंदन हॉस्पिटल मध्ये उपलब्ध सुविधा व हॉस्पिटल च्या कामाची माहिती सांगितली. जेष्ठ नेते दादासाहेब देवकते यांनी गावाविषयी माहिती व उपस्थित सर्व डॉक्टर आणि ग्रामस्थांचे आभार मानून जास्तीत जास्त लोकांनी शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले.प्राचार्य बाळासाहेब शिंदे सर यांनी सर्व रोग निदान शिबिराची आवश्यकता आणि गावातील लोकांमध्ये आरोग्याविषीची जनजागृती हा उद्देश सर्वांसमोर स्पष्ट केला. प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ नेहा साळुंखे पाटील व डॉ मेघना देवकते यांनी स्त्रियांना स्वतःच्या आरोग्याविषयी कशी काळजी घ्यायची याचे मार्गदर्शन केले.सरपंच अर्चना शिंदे यांनी आजपर्यंत गावांसाठी केलेल्या कामाची माहिती दिली.यावेळी प्रमुख मान्यवर व पदाधिकारी यांचा सत्कार ग्रामपंचायत सदस्य संजय लवटे, अजय कांबळे, छाया खांडेकर, सोनाली खांडेकर ,जयश्री चोपडे ,मनिषा निमंग्रे ,अंजना कोळेकर ,वाघ भाऊसाहेब ,ग्रामपंचायत कर्मचारी लक्ष्मण पवार, मनोहर पवार ,शाहरुख खान, संयोजक डॉ पुण्यवंत निमंग्रे, डॉ विनायक उत्तरे, पोलिस पाटील हलिमसो पाटील, जिल्हा सचिव तुकाराम घेरडे सरकार, युवा नेते रफीक शेख, याशीन पठाण, कैयुम शेख, बापुराव वाघमारे, बाळासाहेब वळकुंदे, समाधान शिंदे, प्रकाश निमंग्रे, बाळु झिंजुरटे, संतोष चने ,वगरे सावकर ,इकबाल पटेल, अंकुश निमंग्रे आदी मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला.या सर्व रोग शिबिर मध्ये १९८ नागरीकांची डोळे तपासणी, ११८ नागरीकांना चष्मा वाटप, सी.बी.सी तपासणी ४५ ,औषध वाटप ११०, पुरुष व महिला सर्व रोग तपासणी १३५, जेष्ठ नागरिक यांना काठी वाटप २०, इत्यादी सुविधा देण्यात आली उपस्थित नागरिक, ग्रामस्थांना चहा ,नाश्ता व्यवस्था ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आली होती.या वेळी ग्रामस्थांनी मोठा प्रतिसाद दिला. नुतन जिल्हा सचिव म्हणून तुकाराम घेरडे सरकार यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार गणेश कांबळे यांनी मानले.

# आयफा फिल्म फेस्टीवलच्या धर्तीवर आता मराठी चित्रपट उत्सव-सांस्कृतिक कार्य मंत्री मुनगंटीवार

## दुसऱ्या चंद्रपूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवलचे उद्घाटन;फिल्मसिटीच्या बाहेर महाराष्ट्रात आता नि:शुल्क शुटींग







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून त्याच्या कथानकामध्ये एक अद्भूत शक्ती असते. डॉक्टर पेक्षा चित्रपटाच्या डायरेक्टरचा हात प्रेक्षकांच्या थेट हृदयापर्यंत पोहचतो. अशी चित्रपटसृष्टी राज्यात टिकली पाहिजे, यासाठी आपण सदैव प्रयत्नशील असून फिल्म फेस्टीवलच्या धर्तीवर आता भव्यदिव्य मराठी चित्रपट उत्सव सुरू करणार असल्याची ग्वाही राज्याचे सांस्कृतिक मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

चंद्रपूर येथील मिराज सिनेमा येथे दुस-या चंद्रपूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवलचे उद्घाटन करतांना ते बोलत होते. यावेळी मंचावर प्रसिध्द दिग्दर्शक तथा पुणे फिल्म फेस्टीवलचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, जिल्हाधिकारी विनय गौडा, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, प्रसिध्द दिग्दर्शक समर नखाते, वल्ली चित्रपटाचे दिग्दर्शक मनोज शिंदे, अभिनेता देवा गाडेकर यांच्यासह हरीश शर्मा, राहुल पावडे, डॉ. मंगेश गुलवाडे, प्रकाश धारणे आदी उपस्थित होते.

भाषेपूर्वी अभिनयातून संवाद साधला जात होता, असे सांगून मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, १९१३ मध्ये आलेला 'राजा हरीशचंद्र' हा चित्रपट मूकपट होता. अभिनयातून तो प्रेक्षकांना कळला. १९३२ मध्ये 'अयोध्येचा राजा' हा चित्रपट आला. वैशिष्ट म्हणजे अयोध्येशी चंद्रपूरचे एक वेगळे नाते तयार झाले आहे. प्रभु रामाच्या मंदिरासाठी चंद्रपूर जिल्ह्याचे सागवान गेले असून कुठल्याही भाविकाला अयोध्या येथे दर्शनासाठी चंद्रपूरच्या लाकडाच्या दरवाज्यातूनच जावे लागेल, असा उल्लेख त्यांनी आवर्जून केला.पुढे श्री. मुनगंटीवार म्हणाले, महाराष्ट्राचे वर्णन हे 'चांदा ते बांदा' असे केले जाते. त्यामुळे गत दोन वर्षापासून फिल्म फेस्टिवल चंद्रपूरमध्ये घेण्याचा निर्णय घेतला. चंद्रपूर जिल्हा हा खनीज आणि कोळसाकरीता प्रसिध्द आहे. कोळसा खाणीत हिरा सापडतो तसे चंद्रपूरमध्ये अभिनयातील कोहीनूर आहेत. जयंत सोमलकर, 'एका रात्रीचा पाऊस' या चित्रपटाच्या निर्मात्या प्रतिष्ठा ताई ह्या चंद्रपूरच्या आहेत. आपल्या जिल्ह्यात कलाकारांची कमी नाही, त्यांना संधी मिळवून दिली तर नक्कीच ते संधीचे सोने करतील, त्यासाठीच चंद्रपूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल घेण्याचा प्रयत्न केला आहे. या माध्यमातून येथील कलाकार प्रेरणा घेऊन अभिनय, दिग्दर्शन, निर्माता या क्षेत्रात आपला ठसा उमटवतील. येथील कलाकाराला राष्ट्रीय फिल्म फेअर अवार्ड मिळावा व चंद्रपूरची शान जगामध्ये वाढावी, असा आशावाद सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.चंद्रपूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवलचे हे दुसरे वर्ष आहे. चंद्रपूर आणि आजुबाजूच्या परिसरात चित्रपटाच्या शुटींगकरीता लागणारे सुंदर लोकेशन आहे. येथेही अभिनेते आणि दिग्दर्शक घडावे, याासाठी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जागतिक सिनेमा चंद्रपुरात आणला, असे गौरवोद्गार प्रसिध्द दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी काढले.पुढे ते म्हणाले, जगातील सामाजिक आशय आजचा तरुण टिपत आहे. समाजामध्ये शांततेचा संदेश देण्यासाठी यावर्षी पांढरे कबुतर हे चित्रपट महोत्सवाचे बोधचिन्ह ठेवले आहे. मुंबईबाहेर चंद्रपूर, लातूर, औरंगाबाद येथेही पुणे फिल्म फेस्टीवलचे आयोजन होत आहे. या तीन दिवसात चंद्रपूरकरांसाठी उत्कृष्ट चित्रपटांची मेजवानी पालकमंत्री सुधीरभाऊंनी उपलब्ध करून दिली आहे, याचा प्रेक्षकांनी लाभ घ्यावा. कारण सुधीरभाऊंमध्ये उत्कृष्ट रसिकता असल्यामुळेच हे शक्य झाले आहे, असेही डॉ. जब्बार पटेल म्हणाले.

**मुंबईच्या फिल्मसीटी बाहेर चित्रपटाची शुटींग नि:शुल्क :** मुंबई फिल्मसिटीबाहेर इतर जिल्ह्यात चित्रपटाची शुटींग करायची असेल तर 'वन विंडो सिस्टीम' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच शुटींगसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.

**७५ नाट्यमंदिराची निर्मिती:** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त तसेच नाट्य परिषदेचे हे १०० वे वर्ष असल्यामुळे राज्यात ७५ नाट्यमंदिराची निर्मिती करण्यात येणार आहे. त्यासाठी ९ कोटी ३३ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले आहे.

**फिल्मसिटीत सर्व सुविधा उपलब्ध होणार :** मुंबई येथील फिल्मसिटी ५२१ एकरमध्ये आहे. तसेच त्यालगत १०४ चौ. किमी. मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आहे. या ठिकाणी चित्रपटासाठी लागणा-या सर्व अत्याधुनिक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**मान्यवरांचा सत्कार :** यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते प्रसिध्द दिग्दर्शक समर नखाते, वल्ली या मराठी चित्रपटाचे दिग्दर्शक मनोज शिंदे, अभिनेता देवा गाडेकर, मिराज सिनेमाचे रौनक चोरडीया यांचा सत्कार करण्यात आला.

# कापसाला क्विंटलमागे नऊशेंचा तोटा, हीच का मोदी गॅरंटी-विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार

**मुंबई**–कापसासाठी ७,२०० रुपयांचा हमीभाव निश्चित करण्यात आला. खुल्या बाजारात मात्र ६,३०० रुपयांचा दर मिळत आहे. हमीभावापेक्षा तब्बल ९०० रुपयांनी कमी. बरं हमी भाव मिळणार तरी कसा? कापूस पणन महासंघाचे केंद्र अजूनही उघडलेले नाहीत. सीसीआयने मोजकी केंद्रे उघडली. शेतकरी या केंद्रांवर गेले तर अटींची यादी दाखविली जाते. मग कापूस विकायचा तरी कुठे? या व्यस्थेला कंटाळून वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्याने गाडी भरून नेलेला कापूस पेटवून दिला. उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभावाची मोदी सरकारची गॅरंटी कुठे हरविली, असा संतापजनक सवाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

वडेट्टीवार म्हणाले, पांढरे सोने पिकविणारा प्रदेश म्हणून विदर्भाची ओळख आहे. दीड-दोन वर्षांपूर्वी कापसाला १४ हजार रुपये प्रती क्विंटलचा दर मिळाला. अधिक दराच्या आशेने शेतकऱ्यांनी कापसाची अधिक लागवड केली. मागील वर्षी दर कोसळल्याने अनेकांनी घरातच कापूस साठवून ठेवला. दरवाढीच्या आशेवर दुसरा हंगाम संपण्याची वेळ आली तरी १४ हजार तर दूरच साधा हमीभावही मिळणे कठीण झाले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत हमीभावापेक्षा कमी दराने कापूस खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर गुन्हे दाखल करा, असे निर्देश दिले होते. पण, शेतकऱ्यांना हमीभाव मिळेल अशी व्यवस्था उभारली नाही.बाजारात ७,२०० रुपयांचा भाव देणे शक्य नसल्याचे व्यापारी सांगतात. उद्या शेतकऱ्यांनी तक्रार दाखल केल्यास गुन्हे दाखल होणार म्हणून व्यापाऱ्यांनी युक्ती काढली. कापूस विक्रीला आणणाऱ्या शेतकऱ्यांकडून हमीपत्र लिहून घेत आहेत. कमी दरात कापूसविक्री आपल्याला मान्य असल्याचे लिहून देत आहेत. व्यापाऱ्यांनी कापूस घेतला नाही तर विकायचा कुठे म्हणून हतबल झालेला शेतकरीही हे लिहून देत असल्याचेही श्री. वडेट्टीवार यांनी सांगितले.सरकारने शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी कापूस पणन महासंघाची केंद्रे तातडीने सुरू करावी, ७,२०० प्रती क्विंटलच्या हमीभावाने कापूस खरेदी करावा, खरेदी केलेल्या कापसाचे धनादेश तातडीने देण्यात यावे, सीसीआयच्या जाचक अटी रद्द कराव्या, असेही श्री. वडेट्टीवार यांनी सरकारला खडसावले आहे.वर्धा जिल्ह्यातील रोठा येथील शेतकरी अमोल ठाकरे यांचे जिवंत उदाहरण पहा. खुल्या बाजारात दर कोसळल्याने त्यांनी सीसीआयच्या केंद्रावर कापूस नेला. लहान मुलाला घेऊन दिवसभर आपल्या कापसाच्या विक्रीसाठी प्रयत्न केले. पण, सात-बारावर पेरणीची नोंदणी नसल्याने त्यांचा कापूस घेण्यात आला नाही. खुल्या बाजारात विक्री केला तरी खर्च निघणेही कठीण आहे. संताप अनावर झाला. रक्ताचे पाणी करूनही कापसाला भाव मिळत नाही म्हणून पोटच्या लेकराप्रमाणे जपून वाढविलेला, पिकविलेला कापूस क्षणात गाडीसह पेटवून दिला. यासंदर्भातील व्हिडीओ वेदनादायी आहे. या निष्ठूर सरकारला शेतकऱ्यांशी घेणेदेणेच उरलेले नाही, त्यांच्या संवेदना संपल्या आहेत, असा आरोपही श्री. वडेट्टीवार यांनी केला आहे.

# ठाण्यातील गोळीबार प्रकरण:आमदार गणपत गायकवाड यांचा चालक रंजीत यादवला अटक

**मुंबई**–उल्हासनगरमधील हिल लाईन पोलिस स्टेशनमध्ये घडलेल्या गोळीबार प्रकरणी आमदार गणपत गायकवाड यांचा चालक रणजित यादवला ठाणे गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्याला आज उल्हासनगर कोर्टात हजर करणार आहेत. गणपत गायकवाड यांचे ड्रायव्हर रणजीत यादव यांना ठाणे गुन्हे शाखेने अहमदनगर येथून अटक केली आहे.



गोळीबार प्रकरणांमध्ये अटकेत असलेले गणपत गायकवाड यांच्यासह आता अटक केलेल्या आरोपींची संख्या चार झाली आहे. गणपत गायकवाड यांचा मुलगा परदेशात पळून गेल्याची चर्चा आहे. मात्र अद्याप वैभव गायकवाड बद्दल कोणतीही माहिती मिळू शकली नाही.उल्हासनगरमधील हिल लाईन पोलिस ठाण्यात आमदार गणपत गायकवाड यांनी महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला. या गोळीबार प्रकरणी आरोपी गणपत गायकवाड यांना अटक करण्यात आली आहे. गणपत गायकवाड यांचा मुलगा वैभव गायकवाड आणि नागेश बडेकर हे दोघंही बेपत्ता होते.या गोळीबार प्रकरणी विकी गणात्रा याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्यावर अटकेची कारवाई सुरु आहे. या प्रकरणाचा शोध घेण्यासाठी विविध पथक तैनात करण्यात आली आहेत.हिललाईन पोलिस स्टेशनमधील वरिष्ठ पोलिस निरीक्षकाच्या दालनात महेश गायकवाड याच्यावर आमदार गणपत गायकवाड यांच्याकडून गोळीबार प्रकरणात रोज नवनवीन बाबी समोर येत आहेत. मंगळवारी रात्री फरार आरोपींपैकी कल्याण पश्चिमेतील सुंदरनगर येथे राहणारा दिवेश उर्फ विकी गणोत्राला गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली होती.महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार होण्याच्या काही सेकंद अगोदर आमदार पुत्र वैभव गायकवाड आणि विकी गणोत्रा हे वरिष्ठ पोलिस निरिक्षकाच्या दालनातून बाहेर गेले होते.त्यामुळे प्रमुख सहा आरोपींमध्ये त्याचाही समावेश आहे.तसेच विकी गणोत्रा हा आमदार गायकवाड यांच्या जवळचा कार्यकर्ता असल्याचे बोलले जात असून भाजपामधील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रिय मंत्री कपिल पाटील यांच्यासोबत विकी गणोत्राचे सोशल मिडियावरील फोटोतून त्याची भाजपाच्या वरिष्ठांसोबतची जवळकी समोर येत आहे.शिंदे गटाचे शिवसेना शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यावर पोलिस ठाण्यातील गोळीबारप्रकरणी फरार तीन आरोपींपैकी आमदार गणपत गायकवाड यांचा जवळचा पदाधिकारी असलेला दिवेश उर्फ विकी गणोत्रा याला पोलिसांनी मंगळवारी रात्री अटक केली होती.

# ले-आउट धारकाने अडविलेला गावकऱ्यांचा मार्ग आमदार किशोर जोरगेवार यांनी करुन दिला मोकळा

## गावकर्यांनी मानले आभार, पक्का रस्ता बनविण्यासाठी निधी देणार

**खुटळा । प्रतिनिधी**

खुटळा येथील लवजी नगर कडे जाण-या मार्गात एकाचे ले - आउट असल्याने सदर ले - आउट धारकाने गावाकडे जाणारा मार्ग अडविला होता. त्यामुळे गाव-यांना अडचण निर्माण झाली होती. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी येथे सदर रस्ता गावक-यांसाठी मोकळा करुन दिला आहे. तसेच येथे पक्का रस्ता तयार करण्यासाठी निधी देणार असल्याचे म्हटले आहे. खुटाळा येथे लहुजी नगर आहे. मागील ४० वर्षापासून सदर गाव येथे असून या गावाकडे जाणारा एक मुख्य मार्ग आहे. मात्र मागील काही दिवसांपासून सदर मार्ग आपल्या ले - आउट मध्ये असल्याचे सांगत ले - आउट धारकाने गावक-यांचा रस्ता बंद केला होता. अशात गावक-यांसमोर मोठी अडचण निर्माण झाली होती. दरम्यान गावातील एका मुलीची प्रकृती खराब झाली. तीला रुग्णालयात नेण्यासाठी सदर मार्गाचा वापर करु दिल्या गेला नाही असा आरोप गावक-यांनी केला आहे. ही बाब कळताच आज रविवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी गावाला भेट देत गावक-यांची समस्या समजून घेतली. यावेळी संबधीत ले - आउट धारकाला बोलावून त्याची समज काडण्यात आली असून सदर मार्ग पुन्हा गावक-यांसाठी मोकळा करण्यात आला आहे.तसेच सदर मार्गाचे पक्के बांधकाम करण्यासाठी आवश्यक तिथका निधी आपण उपलब्ध करुन देउ अशी ग्याही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी गावक-यांना दिली आहे. गावकडे जाण्याचा मार्ग कोणीही अडवू शकत नाही. यापुढे असा प्रकार घडता कामा नये. असेही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे. यावेळी गावक-यांनीही आमदार किशोर जोरगेवार यांचे आभार मानले आहे. या प्रसंगी यंग चांदा ब्रिगेडचे ग्रामीण तालुका अध्यक्ष राकेश पिंपळकर, जय मिश्रा यांच्यासह यंग चांदा ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांची आणि गावक-यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .